आर.सी.सी क्र. ७९०/२०२५
सरकार विरुध्द. हर्षकुमार
निशाणी क्र. ५५/ क लगत

दिनांक १८.०७.२०२५ रोजी–

<u>अभियोग पक्षाचा सा. क्र.१ श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर पुढील उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस.,विधीज्ञ यांचे द्वारा सुरु–</u>

४०. मी जर विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक सेवा कार्यालय, औरंगाबाद येथे फिर्याद देतांना कार्यरत आहे असे जर गृहित धरले तर माझा पर्याविक्षाधिन कालावधी मधुन ज्यावेळी मला कायम करायचे आहे तर त्यावेळी तत्कालिन विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक सेवा कार्यालय, औरंगाबाद श्री. संजय सबनिस यांच्याच अधिकारात होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी तत्कालिन विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक श्री. संजय सबनिस हेच प्रस्ताव सही करुन पाठवत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी श्री. संजय सबनिस हे मला जे काही काम सांगतील ते मला ऐकणे व करणे हे मला क्रमप्राप्त आहे. मी श्री. संजय सबनिस यांना मी आजपर्यंत लेखी स्वरुपात कधीही असे कळवले नाही की, तक्रार देण्याचा काम तुम्ही करा मी करणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री. संजय सबनिस यांनी मला कायम करण्याचा प्रस्ताव वरिष्ठांकडे आजअखेर पाठवलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक सेवा कार्यालय औरंगाबाद येथे ईतरही कायमस्वरुपी ईतर अधिकारी कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझा कामाचा कालावधी पाहिला तर सर्व कागदपत्रे व सर्व बाबींची शहानिशा हि तक्रार देण्यापुर्वी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री. संजय सबनिस यांनी मला जे सांगितले तेच मी पोलीसांना सांगितलेले आहे.

**४१.** हे म्हणणे खरे आहे की, जो काही कथीत घोटाळा झाला तो विभागीय क्रिडा संकुल समितीच्या कार्यालयात झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे मी विभागीय क्रिडा संकुल समितीच्या कार्यालयात नियुक्त नसुन विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक सेवा कार्यालय औरंगाबाद येथे कार्यरत आहे. मीच सांगितलेले आहे, विभागीय क्रिडा संकुल समिती व विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक सेवा औरंगाबाद हे वेगवेगळे कार्यालय आहे. मला आजपर्यंत असे वाटले नाही की, मी ज्या कार्यालयातच कार्यरत नाही तसे असतांना देखील त्या कार्यालयाची तक्रार देण्याचा मला अधिकारच नाही. पोलीस निरिक्षक जवाहर नगर पोलीस स्टेशन यांच्या नावे जो कथीत अर्ज दिलेला आहे तो अर्ज श्री. संजय सबनिस यांनी तयार केलेला आहे. सदर अर्ज कुठे तयार केला हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्जाबाबत मला कोणतीही कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणताही पत्रव्यवहार होतो तो दोन प्रतीत होतो व एक प्रत कार्यालयीन प्रत म्हणुन ठेवली जाते. मला नि.क्र.५६ तक्रार दाखल करणे बाबतचा आदेश मला दाखवला, त्यातील अधोरेखांकित **भाग अ** मला दाखवला. सदर तक्रारी अर्जाची कार्यालयीन प्रत हि कार्यालयातील फाईलला आहे. सदर

तक्रारी अर्ज हा महत्वाचा पुरावा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर तक्रारी अर्ज आजपर्यंत न्यायालयात दाखल करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, हा अर्ज श्री. संजय सबनिस यांनी दिलेला आहे त्यामुळे तक्रारही त्यांनीच दयायला पाहिजे होती. सदर तक्रारी अर्जाची प्रत मी वाचली आहे. सदर तक्रारी अर्जाची प्रत मी सरकारी वकीलांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर तक्रारी अर्जावर कोणी सही केली मला माहिती नाही. सदर तक्रारी अर्जावर श्री. संजय सबनिस यांनी सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर तक्रार अर्ज न्यायालयापासुन अडवुन ठेवण्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री. संजय सबनिस यांना तुम्हीच तक्रार दिली पाहिजे होती याबाबत तोंडी विचारणा केली आहे, लेखी विचारणा केली नाही. सदर महत्वाची बाब मी पोलीसांना सांगितली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५६ व नि.क्र.७० तक्रार देण्या संदर्भातील आदेश मी बोगस खोटे तयार करुन हजर केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, श्री. संजय सबनिस यांनी मला का फिर्याद देण्यास सांगितले याचे संपुर्ण कारण फिर्यादमध्ये व आदेशामध्ये कोठेही नमुद नाही.

**४२.** ऑगस्ट २०२० मध्ये विभागीय क्रिडा संकुल औरंगाबाद चे अध्यक्ष विभागीय आयुक्त होते, त्यांचे नाव मला माहिती नाही. विभागीय क्रिडा संकुलाची फेररजना शासन निर्णय ३१ ऑगस्ट २०२० च्या प्रमाणे झाली. हे म्हणणे खरे आहे की, ऑगस्ट २०२० मध्ये विभागीय क्रिडा संकुलचे उपाध्यक्षाचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ विरुध्द फिर्याद दाखल करणेपुर्वी सुध्दा मी ऑगस्ट २०२० मधील अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे नाव माहित करुन घेण्याचे कष्ट घेतले नाही.

**४३.** विभागीय क्रिडा संकुल समिती चे बँक खाते उघडणे, त्याचे बँके खात्याची व्यवस्था ठेवणे यासाठी स्वतंत्र विभाग आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बँक खाते उघडणे, बँकेशी लेखी पत्रव्यवहार, संपुर्ण पैशांचा लेखाजोखा ठेवणे हि कामे त्या स्वतंत्र विभागाअंतर्गत येतात. हे म्हणणे खरे नाही की, माझे असे म्हणणे नाही की, हि सर्व कामे आरोपी क्र.१ हा करत नव्हता. मला नि.क्र.६६ फिर्याद/जबाब मधील अधोरेखांकित **भाग अ** दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, या अधारेखांकित भाग अ नि.क्र.६६ मध्ये आरोपी क्र.१ हा वर नमुद कामे करत असल्याचे नमुद नाही. मला नि.क्र.५६ व नि.क्र.७० आदेश दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, या दोन्ही आदेशात आरोपी क्र.१ हा वर नमुद कामे करत होता असे श्री. संजय सबनिस यांचेही म्हणणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, बँकेची वर नमुद सर्व कामे याबाबत मला काहीही माहिती नाही.

**४४.** हे म्हणणे खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समितीच्या खात्यात येणारा निधी कोणकोणत्या कामासाठी वापरला पाहिजे याविषयीची फेरीस्त मी हजर केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री. अशोक गिरी व श्री. संजय सबनिस यांचे सहीचे नमुने विहित नमुन्यात बँकेकडे लेखी

स्वरुपात दिलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, श्री. अशोक गिरी व श्री. संजय सबनिस यांच्या व्यतिरिक्त ईतर कोणत्याही व्यक्तीला तो अधिकार दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, याचप्रमाणे कोणताही लिखीत स्वरुपात अधिकार आरोपी क्र.१ ला देखील दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, श्री. संजय सबनिस हे अधिकार पदावर आल्यापासुन ते सन २०२४ पर्यंत विभागीय क्रिडा संकुल समितीच्या बँक खात्याच्या सर्व नोंदी नियमीतपणे स्वतः तपासत होते. हे म्हणणे खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समितीच्या बँक खाते चालविण्याचा पध्दतीचा लेखी निर्देश मार्च २०१९ मध्ये दिला तोच सन २०२४ पर्यंत चालु होता व त्यात बदल करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, इंडीयन बँक यांना मार्च २०१९ ला जो निर्देश देण्यात आला होता त्याप्रमाणेच इंडीयन बँक हि विभागीय क्रिडा संकुल समितीचे काम करत आहे व काम करणे अपेक्षित आहे. हे म्हणणे खरे आहे की, इंडीयन बँकेत जावुन खाते पाहण्याचे काम, बँकेतुन रक्कम काढण्याचे काम व टाकण्याचे काम हे आरोपी क्र.१ पाहत होता असे माझे कोठेही म्हणणे नाही. मला नि.क्र.५६ व नि.क्र.७० आदेश दाखवला. यामध्ये आरोपी क्र.१ हा बँकेत जावुन खाते पाहण्याचे काम, रक्कम काढण्याचे व टाकण्याचे काम करत असे कोठेही नमुद केलेले नाही. मला नि.क्र.६६ वरील माझा जबाब दाखवला. यामध्ये सुध्दा आरोपी क्र.१ हा बँकेत जावुन खाते पाहण्याचे काम, रक्कम काढण्याचे व टाकण्याचे काम करत असे कोठेही नमुद केलेले नाही. आरोपी क्र.१ याने बँकेचे स्टेटमेंट मागवणे, पावती बुक लिहिणे, बँकेशी पत्रव्यवहार करणे व त्याचे अभिलेख ठेवणे याविषयी लेखी आदेश आहे तो मी पाहिला आहे. सदर बाबत पोलीसांना सांगितले आहे. सदर बाबत माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. सदर कागद न्यायालयात हजर केलेला नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा बँकेत जावुन खाते पाहण्याचे काम, रक्कम काढण्याचे व टाकण्याचे काम करत असे कोठेही नमुद केलेले नाही. आरोपी क्र.१ याने बँकेचे स्टेटमेंट मागवणे, पावती बुक लिहिणे, बँकेशी पत्रव्यवहार करणे व त्याचे अभिलेख ठेवणे याविषयी लेखी आदेश आहे असे मी खोटे सांगत आहे. मी सन २०२४ मध्ये विभागीय क्रिडा संकुल समितीच्या बँक खात्याचे जे आर्थीक व्यवहार होत होते त्याचे रोकड वहीत ज्या नोंदी ठेवाव्या लागतात त्या नोंदी ठेवणा–या लिपिकाचे नाव मी आजपर्यंत सांगितलेले नाही. पोलीसांना त्या रोकड वहितील नोंदी दिलेल्या आहेत. सदर रोकड नोंदी न्यायालयात दाखल नाहीत त्याचे कारण मी सांगु शकत नाही. श्री. अशोक अवचार, पोलीस अधिकारी यांना रोकड नोंदी दिलेल्या आहेत. रोकड नोंदीची एक वही होती, त्याची पाने किती होती ते मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला व्यक्तीशः विभागीय क्रिडा संकुल समितीच्या आर्थीक व्यवहारा बाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, विभागीय क्रिडा संकुल समितीचे जे काही खर्च होत होते त्याच्या टिपण्या मी व्यक्तीशः पाहिलेल्या नाहीत. सदरील टिपण्या स्वप्नील तांगडे, वरिष्ठ लिपिक घेत होते. स्वप्नील तांगडे हेच त्या टिपण्या तपासत व नंतर विभागीय उपसंचालकांच्या समक्ष त्या टिपण्या ठेवल्या जात होत्या. सदर टिपण्यांची पाने किती होती ते मी सांगु शकत नाही. सदर टिपण्या सुध्दा श्री. अशोक

अवचार पोलीस अधिकारी यांना दिलेल्या आहेत. त्या टिपण्या न्यायालयात हजर नाहीत त्याचे कारण मला सांगता येणार नाही. मला माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र.४ मधील मजकुर **''जे काही खर्च होत होते त्याविषयी प्रथम कार्यालयीन टिपणी तयार होत असे, मग ती कार्यालयीन टिपणी हि प्रथम उपसंचालक सही करत आणि मग ती अंतीम मंजुरी करिता जिल्हाधिकारी यांच्याकडे दिली जात. जिल्हाधिकारी यांच्याकडुन त्या खर्चाला मंजुरी मिळाल्यावर मगच त्या रकमेचा धनादेशव्दारे ती रक्कम अदा केली जात होती''.** सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला होता किंवा नाही ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६६ मधील माझ्या जबाबात नमुद मजकुर माझ्या जबाबात/फिर्यादीत नमुद नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सदरचा मजकुर हि अतिरिक्त स्वरुपात सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला तक्रार दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अधिकृत करणे व प्राधिकृत करणे हया दोन वेगळया दोन गोष्टी आहेत. अधिकृत करणे म्हणजे अधिकार देणे (Authorized) व प्राधिकृत म्हणजे मंजुर देणे (Grant/Approval) होय. हे म्हणणे खरे आहे की, मी विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये मी नोकरीलाच नाही. हे म्हणणे खरे नाही की, बनावट कागदपत्रांच्या आधारे आरोपी क्र.१ विरुध्द कोणताही अधिकार नसतांना बनावट अधिकार पत्राने मी खोटी फिर्याद दाखल केली आहे.

**मा. न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उर्वरीत उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.**

समक्ष

-/स्वाक्षरीत/-
**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
**दिनांक – १८/०७/२०२५**

श्रवणोत्तर स्वीकृती.

-/स्वाक्षरीत/-
**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद